NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०१.११.२०२६ रविवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ३१.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून एकुण १,२३,७१०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून एकुण ४,४३५/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २७ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३३ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ११२ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २९८ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४६ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ४८ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये २४ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १३९ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १८ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०९ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१४८ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये १३ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३१ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०४४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ७,२६,२००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पथकाची कामगिरी :– हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.

दिनांक ३१.१०.२०२६ चे १७.५० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, श्रवण उर्फ खदान नावाचा हद्दपार इसम हा पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत हजारीपहाड ते एलएडी कॉलेज रोडवर, खनिज विहार समोरील मैदानाजवळ सार्वजनिक ठिकाणी प्राणघातक शस्त्र बाळगुन धुमाकूळ घालत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम धुमाकूळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव श्रवण उर्फ खदान सुशिल मडावी वय २१ वर्षे, रा. पांढराबोडी पोलीस चौकीमागे, पांढराबोडी, अंबाझरी, नागपुर असे

सांगीतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी मुठ असलेला लोखंडी चाकु कि. २००/— रु. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०२ यांचे हद्दपार आदेश क्र. ०४/२०२६ दिनांक १५.०४.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगून धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सफौ. गजेंद्रसिंग ठाकुर, पोहवा महेंद्र सडमाके, प्रविण शेडके, सुरेश तेलेवार, पोअं. मंगल जाधव, चापोअं. विवेक श्रीपाद यांनी केली.

<u>३) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रमांक ०६ यांचेकडून दिनांक २०.०८.२०२६ ते ३१.१०.२०२६ कालावधीत एका गुन्हयात म.को.का. अन्वये कारवाई तसेच कलम ५५ म.पो.का प्रमाणे ०४ टोळीतील १८ व कलम ५६ म. पो.का. प्रमाणे ०६ हद्दपार आदेश पारीत करून एकुण २४ गुन्हेगार हद्दपार.</u>

मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उपआयुक्त, परि. क्रमांक ०६, नागपुर शहर यांनी दिनांक २०/०८/२०२६ रोजी पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर त्यांनी दिनांक २०/०८/२०२६ ते माहे ऑक्टोंबर २०२६ च्या कालावधीत पोलीस ठाणे खापरखेडा, नागपुर शहर येथील कलम १०९(१),११५(२),११८(१),१८९ (२),१९०, १९१(३) भा.न्या.सं. २०२३ सहकलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. या मकोकाचे गुन्हयात **टोळी प्रमुख ०१)** सुरज कन्हैयालाल कावळे वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. ०२ एअरटेल टॉवर जवळ खापरखेडा, नागपुर शहर व **टोळी सदस्य ०२)** शुभम उर्फ शेरू अशोक उईके वय २६ वर्ष रा. वार्ड क्र.२, एअरटेल टॉवर, नागपुर शहर, **०३)** साहील उर्फ बुट—या कैलास बागडे ,वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ विदया विहार जवळ खापरखेडा, नागपुर शहर, **०४)** हेंमत उर्फ सुदामा मधुकर चापाडाहाके, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, विदया विहारजवळ खापरखेडा, नागपुर शहर, **०५)** संघर्ष कैलास बागडे, वय २० वर्ष रा. वार्ड क्र. ०१, खापरखेडा, नागपुर शहर, **०६)** शांतनु राजु बागडे वय १९ वर्ष रा. चिचोली खापरखेडा, **०७)** मोहन रोशनसिंग खुरावत वय २४ वर्ष रा. वार्ड क्र. ०२ निंबा ता. पारशिवनी, **०८)** युगांत राजेश सार्वे वय १८ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ चिचोली खापरखेडा, **०९)** प्रियांशू विदयाधर रक्षित वय १८ वर्ष रा. वार्ड क्र. ०२ रा. खापरखेडा, **१०)** जितु रामचंद्र कनोजे वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ ढोके बुध्द विहाराजवळ खापरखेडा, ११) शेख समीर शेख रहीम वय २६ वर्ष रा. चित्तरंजन नगर, कामठी, **११)** चेतन सतिशराव पटमासे वय ३४ वर्ष रा. वार्ड क्र. ०३, खापरखेडा, ता. सावनेर जि. नागपुर, **१२)** चेतन सतिशराव पटमासे वय ३४ वर्ष रा. वार्ड क्र. ०३, खापरखेडा, ता. सावनेर जि. नागपुर, **१३)** हर्ष उर्फ आकाश राजेश वर्मा वय २३ वर्ष रा. रमा नगर, सम्यक बुध्द विहार जवळ, कामठी यांनी उपरोक्त गुन्हा व त्यापुर्वी सुध्दा टोळी तयार करून संघटीतरित्या गुन्हे केल्याने त्यांचेविरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनीयम १९९९ चे कलम ३ (१)(पप),३(२),३(४) अन्वये कारवाई करून सदरचे गुन्हयात एकुण १३ गुन्हेगारांना जेरबंद केले.

तसेच टोळी तयार करून संघटीतरित्या गुन्हे करणारे गुन्हेगार **०१) टोळी प्रमुख ०१)** अक्षय उर्फ डग्गम पुरूषोत्तम भोसकर, वय २७ वर्ष, राह. श्याम मंगल कार्यालय, खापरखेडा व **टोळी सदस्य ०२)** सुमित शेशराव वंजाळ, वय २८ वर्ष, राह. वार्ड क्र. ४, खापरखेडा, **०३)** अनिकेत संघसेवक वासनिक, वय १८ वर्ष, राह. वार्ड

क्र ०४, खापरखेडा, **०४)** सुनिल रामदास वाघधरे, वय ४२ वर्ष, राह. वार्ड क्र ०४, चनकापुर, खापरखेडा, **०५)** पियुश हिरामण पाल वय २० वर्ष, राह. वार्ड क्र ०४, खापरखेडा, तह. सावनेर जिल्हा. नागपूर पोलीस ठाणे खापरखेडा, नागपूर शहर, **०२) टोळी प्रमुख ०१)** अमन समिर पुरोहीत, वय २५ वर्ष, राह. लाल ओली, पोलीस ठाणे जुनी कामठी, नागपुर शहर व **टोळी सदस्य ०२)** लोकेश उर्फ बंडु हेमराज वांदीले, वय २६ वर्ष, राह. हनुमान नगर, पेरकीपुरा, कामठी, **०३)** कृष्णा मनोज श्रीवास्तव, वय २० वर्ष, राह. जयस्तंभ चौक, बस स्टॅन्डजवळ, पोलीस ठाणे जुनी कामठी, **०३) टोळी प्रमुख ०१)** कपिल कुंदन रंगारी, वय २६ वर्ष, राह. रमा नगर, रेल्वे स्टेशन रोड, पोलीस ठाणे नविन कामठी, नागपुर शहर, व **टोळी सदस्य ०२)** अथांग विक्रम मेश्राम, वय २१ वर्श, राह. सम्यक बौध्द विहाराजवळ, रमा नगर, **०३)** शेख नासीर शेख नाजीर, वय २१ वर्ष, राह. सुदाम बडगे किराणा स्टोअर्सजवळ, रेल्वे क्वॉर्टर्स, चित्तरंजन नगर, **०४)** शेख शमिम शेख सलीम, वय २२ वर्ष, राह. चित्तरंजन नगर, अब्दुल शहा दरगाहजवळ, **०५)** सुमित उर्फ भोला रतन रंगारी, वय १९ वर्ष, राह. रमा नगर, पोलीस ठाणे नविन कामठी, नागपुर शहर, **०४) टोळी प्रमुख ०१)** अक्षय रमेश पाईकराव, वय २६ वर्ष, राह. वार्ड नं. १०, इंदीरा प्रगती नगर, महादुला, पोलीस ठाणे कोराडी, नागपुर शहर व **टोळी सदस्य ०२)** आशिश उर्फ चंपा सुरेश गुप्ता, वय २३ वर्ष, राह. सिध्दार्थ नगर, मच्छी मार्केट, महादुला, **०३)** मेहुल उर्फ बाप्पा रमेश पाईकराव, वय २६ वर्ष, राह. वार्ड क्र १०, इंदीरा प्रगती नगर, महादुला, **०४)** राज राजेश वॉल्टर, वय २२ वर्ष, राह. वार्ड क्र ०६, इंदीरा प्रगती नगर, महादुला, **०५)** अरूण फिरोज पिटकर, वय २२ वर्ष, राह. वार्ड क्र १०, इंदीरा प्रगती नगर, महादुला, पोलीस ठाणे कोराडी, असे **०४ टोळीतील एकुण १८ सदस्य यांना कलम ५५ म.पो.का. प्रमाणे** व **०१)** आतिश उर्फ ऑस्टीन रॉबर्ट फ्रान्सीस, वय २८ वर्ष राह. सेक्टर नं. १२, श्री कृष्णधाम झोपडपट्टी, वॉक्स कुलर मागे, पोलीस ठाणे कोराडी, **०२)** भावेश उर्फ यश सुनिल मेश्राम, वय २० वर्षे, राह. लुंबीनी नगर, विक्की किराणा दुकानाजवळ, पोलीस ठाणे जरीपटका, **०३)** शेख रज्जाक शेख रहमान, वय ३६ वर्षे, राह. प्लॉट नं. ४४/ए, बेझनबाग, गौतम नगर, मेश्राम किराणा दुकानाजवळ, पोलीस ठाणे जरीपटका, **०४)** स्वप्नील रामदास तळेकर, वय ३६ वर्षे, राह. वार्ड नं. ०२, खापरखेडा, पोलीस ठाणे खापरखेडा, **०५)** अमन निशांत इंदुरकर, वय २६ वर्षे, राह. म्हाडा क्वॉर्टर नं. १०७, बिल्डींग नं. ६०, नारी रोड, पोलीस ठाणे कपिल नगर, **०६)** अमान खान कलीम खान, वय २२ वर्षे, राह. सईद नगर, रनाळा, पोलीस ठाणे नविन कामठी असे **कलम ५६ म.पो.का. प्रमाणे एकुण ०६ गुन्हेगार** यांनी अनुक्रमे पोलीस ठाणे खापरखेडा, कोराडी, जरीपटका, कपिल नगर, जुनी कामठी, नविन कामठी चे हद्दीत लोकांना दमदाटी व मारपिट करणे, संगणमत करून ईच्छापुर्वक दुखापत करणे, अश्लिल शिवीगाळ करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, समान उद्दिष्ट साधण्यासाठी बेकायदेशिर जमाव करणे, प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होवुन दंगा करणे, जुगाराचा अड्डा चालविणे, गंभीर दुखापत किंवा मृत्युचे भय घालुन खंडणीची मागणी करणे, अवैद्यरीत्या प्राणघातक व अग्नि शस्त्रे जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, गैरनिरोध करणे, दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पुर्व तयारी करून नंतर गृह अतिक्रमण करणे संगनमत करून खुन करणे, खुनाचा प्रयत्न करणे, दंगा करणे, फौजदारीपात्र धाकदपटशा करून मारण्याची धमकी देणे, अवैधरित्या प्राणघातक अग्नीशस्त्रजवळ बाळगणे, दरोडा घालणे, सुर्योदयानंतर व सुर्यास्तपुर्वी एखादा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने संशयास्पद स्थितीत वावरणे, घातक हत्याराने ईच्छापुर्वक दुखापत करणे, नुकसान करून आगळीक करणे, लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासुन परावृत्त करण्याकरीता हमला/बलप्रयोग करणे, खंडणी मागणे अशा प्रकारे गुन्हे केलेले असुन त्यांचे या कृत्यामुळे परिसरातील लोकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली असल्याने सदर ईसमांवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करून देखील त्यांचे प्रवुत्तीत कुठलीही सुधारणा झाली नाही. त्यांचे गुन्हयांना आळा बसावा व परिसरात शांतता व सुव्यवस्था रहावी या हेतुने मा. पोलीस उप आयुक्त, परिमडंळ क्रमांक ०६, नागपुर

शहर, यांनी गुन्हेगार ईसमांविरूध्द हद्यपार आदेश पारीत केलेले असुन त्यांना नागपुर शहर व नागपुर जिल्हा (ग्रामिण) हद्यीतील पोलीस ठाणे पारशिवनी, खापा, सावनेर, कळमेश्वर, कन्हान, मौदा, कुही हद्यीतुन हद्दपार करण्यात आलेले आहे.

सदरची कामगीरी मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांनी पदाचा पदभार स्विकारताच अवघ्या ०२ महिन्याचे कालावधीत केलेली आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे खापरखेडा :– चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २६.१०.२०२६ चे १८.०० वा. ते दिनांक ३१.१०.२०२६ चे १३.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत, वार्ड क्र. ४, चर्चजवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी आयुष प्रकाश बागडे वय २५ वर्षे हे चेन्नई येथे व त्यांचे आई वडील हे राहते घराला कुलुप लावुन मोठया मुलाकडे सुरत येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील गोदरेज आलमारीतील रोख ७०,०००/–रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,०५,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे मपोउपनि प्रियंका पाटील ७४४७८१८९६६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे वाडी :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ३०.१०.२०२६ चे १८.४० वा. चे सुमारास, पांढरे रंगाचे अशोक लेलॅन्ड कंपनीचे वाहन क्र. एमएच ३६ एए १६५२ चा चालक नामे सुभाष दामोधर मोटघरे वय ६० वर्ष रा. गणपती मंदीरसमोर, सोनबा नगर, वाडी, नागपुर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पोलीस ठाणे वाडी हद्यीत खडगाव रोडवरील लावा स्मशान घाटजवळ रोडवर हिरो होंडा डिलक्स मोटार सायकल क्र. एमपी २८ एमबी ९४९७ ला जोराने धडक मारुन मोटार सायकलवरुन जाणारे तीन इसम नामे १) राजु ठाकुर वय ५४ वर्ष रा. सोनबा नगर, वाडी, नागपूर २) सिध्दार्थ चोखाराम धोंगडे वय ६० वर्ष रा. लावा, वाडी, नागपूर व ३) आकाश चुन्नीलाल चोखांद्रे वय ५५ वर्ष रा. लावा, वाडी नागपूर यांना गंभीर जखमी करुन जखमींना कोणतीही मदत न करता घटनास्थळावरुन पळुन गेला. पोलीसांनी जखमींना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, जखमी राजु ठाकुर व सिध्दार्थ चोखाराम धोंगडे यांना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. जखमी आकाश चुन्नीलाल चोखांद्रे याचा उपचार सध्या किंग्सवे हॉस्पिटल येथे सुरु आहे.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोहवा प्रकाश काटकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. उत्तम जायभाये ९५५२५३८०९८ यांनी आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१),१२५(अ),१२५(ब) ,२८१, ३२४(४) भा.न्या.सं. सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. वाहन चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे खापरखेडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ३१.१०.२०२६ चे १७.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मामेभाऊ नामे ऋषिकेश विष्णु वंजाळ वय २२ वर्ष रा. वलनी वस्ती, खापरखेडा, नागपुर हा त्याचे नवीन घेतलेल्या व वाहन क्रमांक न मिळालेल्या मोटार सायकलवर त्याची आजी नामे श्रीमती चिमाबाई शंकर वंजाळ वय ८० वर्ष रा. वलनी वस्ती, खापरखेडा यांना मागे बसवुन आजीला नातेवाईकांकडे पोहोचविण्याकरीता जात असता, पोलीस ठाणे खापरखेडा हद्यीत,

सब्बलनाला, चणकापुर सावनेर येथे ट्रक क्र. एमएच ४० सीए ७८७३ चा चालक याने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मामेभावाचे मोटारसायकला धडक मारुन अपघात करुन घटनास्थळावरुन पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीचा मामेभाऊ हा ट्रकचे मागील चाकात आल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यु झाला. तसेच त्याची आजी चिमाबाई ही गंभीर जखमी झाली. गंभीर जखमी चिमाबाई यांना उपचाराकरीता न्यु लाईफ हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले असुन उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी विनोद गोपाळ मुल्हार वय ४५ वर्ष रा. चणकापुर, वार्ड क्र. ६, खापरखेडा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. विलास करगामी ९७६६३७६४८२ यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम १०६(१),१२५(अ),२८१ भा.न्या.सं. सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी वाहन चालकाचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.